ग्रामपंचायत- देवठाण व समशेरपूर, ता.अकोले येथील सखोल दप्तर तपासणी करणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग- २
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- साप्रवि-२/ग्रापं-३/१९८/२०२१
दिनांक- ३१ मार्च २०२१

वाचा :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र. वशि/ग्रापं-२/१४६/२०२१, दिनांक- २४/०२/२०२१
२. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/८७/२०२१, दिनांक- २६/०२/२०२१

संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये, श्री.आर.के.वर्पे, सेवा निलंबित ग्राम विकास अधिकारी, तत्कालीन ग्रामपंचायत- देवठाण व समशेरपूर, ता.अकोले येथे कार्यरत असताना ग्रामपंचायत-देवठाण येथे अर्सेनिक अल्बम ३० गोळयाचे दिनांक- १७/०२/२०२१ ते दिनांक- १९/०२/२०२१ या कालावधीत १०० टक्के वाटप केलेले आहे असा दिनांक- २९/०१/२०२१ रोजी खोटा अहवाल देऊन प्रशासनाची फसवणूक / दिशाभुल केलेली आहे असे कळविले होते.

संदर्भ क्र.२ चे आदेशान्वये श्री.वर्पे, यांना सेवा निलंबित करणेत आलेले आहे.

प्रकरणी ग्रामपंचायत-देवठाण व समशेरपूर, ता.अकोले येथील सखोल दप्तर तपासणी करणेकामी श्री.महेश डोके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगांव यांची नियुक्ती करणेत येत आहे. सदर प्रकरणी आपलेस्तरावरुन एक विस्तार अधिकारी (पं) यांची सहाय्यक म्हणून नेमणूक करावी.

तरी ग्रामपंचायत-देवठाण व समशेरपूर, ता.अकोले येथील सखोल दप्तर तपासणी करुन वस्तुनिष्ठ व मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ सादर करावा. तसेच सदर अहवालाची एक प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांना दयावी.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगांव यांचा अहवाल प्राप्त होताच दोषारोपासह प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावा.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202103310 ६०००७ असा आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.महेश डोके,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती शेवगांव

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले,
२/- दप्तर तपासणीकामी आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.